
# कथकसम्राट
# बिरजूमहाराज



लेखक - डॉ. नंदकिशोर कपोते

# BIRJU MAHARAJ ....

Dr. Nand Kishore Kapote , a senior student has paid a fitting tribute to his guru Pandit Birju Maharaj in his book ***'Kathak Samrat Birju Maharaj '*** which is an offering long overdue.

In his book Nand Kishore Kapote has been able to capture vivid account of the time and embiance in which the Kathak dance grew to be accepted by a larger public in India.

The history of dance in India requires to be addressed so as to review the evolution of Kathak which has been continuously extending its repertoire over the past many generations in different regions of India. The different Gharanas of Kathak took their names and practiced their different styles according to the areas in which they were established. Nand Kishore has referred mainly to the Lucknow Gharana which is where he received his training. There are interesting episodes narrated by Ammaji, Birju Maharajji's mother, who spent an entire life under the same roof with the great doyens of the Lucknow Gharana.

To describe Birju maharaj as a dancer is a futile activity. What yardsticks would you use? He goes much beyond away. He has been rated as talented, versatile, creative, imaginative etc.

I have watched Birju Maharaj now for nearly 60 years and have come to the conclusion that he is a phenomena. Even the seven wonders of the world were man - made, but Birju Maharaj was

born to be an artist, not made. The Kathak world will have to see many centuries to produce another Birju Maharaj if ever it does. When you watch the flowing movement of clouds, the gushing of the sea waves you don't try and analyze the technique or how the water or the wind was trained into doing it. It just happens, it is a phenomena and is the way one should watch Maharajji.

It would not be amiss to say that because of Birju Maharajji's contributions in terms of his performances in India and abroad that, Kathak today, enjoys a respectable and prestigious place amongst the classical dance forms of India.

***(Kumudini Lakhia)***

# प्रस्तावना

नंदू ऊर्फ आमच्या नंदकिशोरचा मला फोन आला, की दीदी मी पुस्तक लिहितोय. त्यावर मी विचारलं, ''कोणत्या विषयावर लिहितो आहेत. त्यावर तो म्हणाला, ''महाराजजी अर्थात पद्‌विभूषण बिरजूमहाराज यांच्याविषयी त्यावर मी त्याला म्हटलं. तू अगदी चांगले कार्य हाताशी घेतले आहेस. त्याला माझ्या शुभेच्छा! तो म्हणाला, ''दीदी आपली प्रस्तावना हवी आहे''. असे म्हटल्यानंतर काही क्षणभर मी थांबलेच! समजेना काय उत्तर द्यावे.

बराच काळ विचार केल्यानंतर मी होकार देऊन टाकला. कारण महाराजजींना मी खूपच जवळून पाहिले असल्याने त्यांच्याविषयीच्या पुस्तकात लिहिणे मला निश्चितच आवडणारे होते. नंदकिशोरने अत्यंत परिश्रमपूर्वक हा सर्व प्रपंच केल्याचे पुस्तक वाचताना जाणवते.

नृत्याच्या उगमापासून ते कथकनृत्याच्या उगम व विकास आणि विविध घराण्यांच्या कथकविषयीची माहिती छायाचित्रांसहित या पुस्तकात दिली आहे. तसेच कथकमध्ये योगदान देणाऱ्या लखनौ घराण्याचा त्यांच्या नृत्यशैलीवर अधिक भर या पुस्तकात दिला आहे. लखनौ घराण्याची वंशावळ, बिंदादिन महाराजजींपासून सुरू झालेली परंपरा

पंडितजींचे चिरंजीव दीपक महाराज व त्यांच्या अपत्यापर्यंत कशी आली, याची माहितीही या पुस्तकात आहे.

विशेष म्हणजे महाराजजींची दुर्मिळ छायाचित्रे पुस्तकाचे खास वैशिष्ट्य आहे. त्यांची तरुणपणातील छायाचित्रे, विविध वाद्य वाजविताना, विविध नृत्य सादर करताना, चित्रे काढताना अशी बहुढंगी छायाचित्रे पाहणाऱ्याचे लक्ष वेधतात. तसे पाहले तर एवढेच सांगावेसे वाटते की, पुस्तक पाहिल्यानंतर लखनौ घराण्याच्या कथकचा, तसेच महाराजजींचा जीवनपट साकारल्याचे जाणवते. यासाठी डॉ. नंदकिशोर कपोते यांनी घेतलेले परिश्रम हे खऱ्या अर्थाने महाराजजींना गुरूदक्षिणा ठरणार आहे. त्याचबरोबर 'लोकमत'चे उपसंपादक विश्वास मोरे यांनी 'लोकमत'मध्ये लिहिलेल्या लेखांतून महाराजजींच्या नृत्यशैली, कलाशैलीवर विशेष प्रकाश टाकला आहे.

पुस्तकाचे प्रकाशन महाराजजींच्याच उपस्थितीत करण्याचा मानस डॉ. कपोते यांनी बोलून दाखविला. पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यानंतर हे पुस्तक सर्वांना आवडेल. असा विश्वास मला वाटतो. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते, की कपोते यांनी केलेला हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे. पुस्तकाला मोठे यश मिळो! यानिमित्ताने मी एवढीच सदिच्छा व्यक्त करते.

श्रीमती कुमुदिनी लाखिया

(पद्मश्री, ज्येष्ठ कथक नर्तिका)

मैं नंद किशोर कपोते को कई सालों से जानती हूँ। महाराष्ट्र में नंद किशोर कत्थक नृत्य के लिए बहुत ही अच्छा कार्य कर रहा है। मुझे नंद ने पूना नृत्य के लिए बुलाया था - वहाँ उसका इस क्षेत्र में काम देख कर मैं बहुत प्रसन्न हुई। उसकी गुरू के प्रति आदर, गुरू निष्ठा देखने को मिली। नंद

नंद किशोर ने कत्थक नृत्य पर किताब लिखी है। यह कत्थक नृत्य में बहुत ही महत्त्वपूर्ण योगदान है। किताब में नृत्य निर्मिती, कत्थक नृत्य के विषयों में और अपने गुरू बिरजू महाराज के नृत्य कार्य के बारे में लिखा है। इसके अलावा महाराष्ट्र में हर घर में कत्थक नृत्य का प्रचार मैंने और गोपी कृष्ण ने किया है और नंद किशोर ने किताब में हमारा उल्लेख किया है।

यह किताब नृत्य सीखने वाले, नृत्य में रूचि रखने वाले समस्त रसिकों को बहुत ही उपयोगी साबित होगी। बड़े गुरूजनों के साथ मेरा आशीर्वाद तो सदा ही नंद किशोर को है।

मराठी में लिखी हुई यह किताब कत्थक के प्रचार में बहुत महत्वपूर्ण साबित होगी। मेरी शुभ कामनाएँ उसके साथ हैं। जैसे "नृत्य ही मेरा जीवन है" वैसे नंद किशोर भी कत्थक की सदा सेवा करता रहे और अपने गुरूजनों का नाम ऊँचा करें। मैं सदा ही उसके साथ हूँ और चाहूंगी कि यह किताब हर नृत्यकार पढ़े और बिरजू भईया के कत्थक नृत्य में योगदान की जानकारी हो।

नंदकिशोर ने यह किताब बहुत ही सुन्दर ढंग से लिखी है।
इसमें कुछ फोटो तो पुरानी यादो को ताजा कर देते है।
कत्थक प्रेमीयो को भूली गई बातो का इस किताब द्वारा परि-
होगा।

इस तरह नंद किशोर और भी किताबे लिखे व कत्थक का
नाम रोशन करे। यह मेरा नंदकिशोर को आशीर्वाद है।

सितारा देवी

**कथकक्वीन सितारादेवी**

**ज्येष्ठ कथक नर्तिका**

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

(अभिमत विद्यापीठ)
विद्यापीठ भवन, टि. म. वि. नगर, गुलटेकडी, पुणे - ४११०३७

Estd. 6-5-1921

डॉ. दीपक ज.टिळक
कुलगुरू


## शुभेच्छा

मला कळविण्यास आनंद वाटतो की, भारतीय नृत्यकलेतील कथक नृत्यशैलीचे सम्राट माननीय पद्मविभूषण पं. बिरजू महाराज यांच्या नृत्यकलेतील योगदानाविषयी सविस्तर माहिती असलेले **कथक सम्राट बिरजू.महाराज** हे पुस्तक प्रथमच डॉ. नंदकिशोर कपोते यांनी मराठीतून संपादित केलेले आहे. सदर पुस्तकात त्यांनी नृत्यकलेची निर्मिती, कथक नृत्यशैलीचा इतिहास आणि पं. बिरजू महाराज यांचे नृत्यकलेच्या विकासातील योगदान याविषयीची नृत्यशास्त्रात रूची असलेल्यांना उपयुक्त ठरणाऱ्या माहितीचा समर्पक असा आढावा घेण्यात आलेला आहे.

पं. बिरजू महाराज यांचे शिष्य डॉ. नंदकिशोर कपोते यांना त्यांच्या नृत्यकलेतील संशोधन कार्यासाठी विद्यापीठाने 'विद्यावाचस्पती (पीएच्.डी.)' या पदवीने सन्मानीत केलेले आहे. योगायोगाची गोष्ट अशी की पदवीप्रदान कार्यक्रमास पंडितजी जातीने उपस्थित होते आणि आता या पुस्तकाचे प्रकाशनही त्यांच्याच हस्ते होत आहे. विद्यापीठाच्यादृष्टीने ही घटना अभिमानास्पद आहे.

पंडितजींचे आशीर्वाद लाभलेले त्यांचे शिष्य आणि या विद्यापीठाचे विद्यार्थी डॉ. नंदकिशोर कपोते यांचे नृत्यकलेतील कार्य वृद्धिगंत होवो हीच याप्रसंगी मी शुभकामना व्यक्त करतो.

२० जानेवारी २००६

(दीपक ज. टिळक)



## मनोगत

लहानपणी कथकनृत्य शिकत असताना माझ्या मनात नृत्याविषयी अनेक शंका, प्रश्न निर्माण व्हायचे. परंतु त्या शंकेचे निरसन, त्यावेळी होऊ शकले नाही.

१९७८ साली ज्यावेळी मी भारत सरकारची राष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळवून कथककेंद्र दिल्ली येथे गुरू पद्मविभूषण पं. बिरजूमहाराजजींकडे नृत्य शिकण्यासाठी गेलो, त्यावेळी महाराजजींची प्रसन्न दैदिप्यमान मुद्रा पाहूनच मन शांत झाले. व माझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळणार अशी पक्की खात्री झाली.

महाराजजींकडे नृत्य शिकण्यास सुरुवात केल्यानंतर मी काही दिवसांतच महाराजजींचा प्रिय शिष्य झालो. हे मी माझे सौभाग्य समजतो. महाराजजी कुठेही कार्यक्रमासाठी गेले तरी मला बरोबरच घेऊन जायचे. परदेशातही मी जात असे. महाराजजींच्या सानिध्यात राहुन आपोआपच कळत-नकळत हृदयपटलावरील नृत्याविषयीचे एक-एक पान उलगडले जात होते.

महाराजजींच्या विविध पैलुंचे सतत दर्शन होत होते. महाराजजींबरोबर दिवस-रात्र राहून महाराजजींचे जीवन चरित्र मी लिहावे. ही गुरू महाराजजींनी माझ्याजवळ व्यक्त केलेली इच्छा पूर्ण करण्याचा निर्धार मी त्याचवेळी केला आणि महाराजींच्या मार्गदर्शनाखाली नृत्य संशोधनाचा श्री गणेशा झाला. नृत्यात संशोधन करण्याची डॉक्टरेट मिळविण्याची जिद्द प्रथमपासूनच होती. त्यामुळे संशोधन कार्याला आपोआपच गती आली.

लखनौला गेल्यावर महाराजजींच्या मातोश्री महादेई अम्माजी यांच्याशी भेट होत असे. अम्माजींशी गप्पा मारायला लागलो की, अम्माजी महाराजजींचे

लहानपणीचे किस्से गंमती-जमती सांगायच्या. अम्माजींनी लखनौ घराण्याची सुरुवात तसेच संपूर्ण कथकचा इतिहास सांगितला.

अम्माजींनी सांगितलेल्या अनमोल गोष्टी त्याच वेळी मी त्यांच्या शब्दात रेकॉर्ड करून घेतल्या. त्याचा उपयोग मला माझ्या संशोधन कार्यासाठी महत्त्वपूर्ण पुरावा सिद्ध झाला. गुरू महाराजजींच्या मार्गदर्शनाखाली मी 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठा'तून (जानेवारी २००५) विद्यावाचस्पती (डॉक्टरेट) पदवी संपादन केली. या पदवी प्रदान समारंभास स्वत: गुरू महाराजजी उपस्थित होते. ही एक ईश्वरी लिलाच होती.

४ फेब्रुवारीला महाराजजींचा वाढदिवस! या वेळी महाराजजींवरील पुस्तक प्रसिद्ध करायचे ठरविले. पुस्तक मराठी भाषेतूनच लिहायचे पक्के केले. मराठीत पं. बिरजूमहाराजांवर अजुन पुस्तक लिहिले नाही. एकूणच कथक नृत्यावरच मराठीत पुस्तके हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच आहेत. त्यामुळे कथक नृत्याची आवड असणाऱ्यांना कथकविषयी सखोल माहिती मिळणेही अशक्य. पं. बिरजूमहाराजजींच्या नृत्यकार्याची माहिती महाराष्ट्रात प्रत्येकाला व्हावी. तसेच कथकक्वीन सितारादेवी, स्व. गोपीकृष्ण या महान कलाकारांनी महाराष्ट्रात कथकनृत्याचा प्रचार व प्रसार केला.

कथकनृत्य लोकप्रिय केले. त्यांची सविस्तर माहिती मराठी माणसाला व्हावी. या उदात्त हेतूने मराठीत पुस्तक लिहिले. सर्वसामान्यांना आवडेल, समजेल अशी भाषाशैली वापरली. यामुळे हे पुस्तक सर्वांना आवडेल. कथक नृत्य अधिक लोकप्रिय होईल. अशी खात्री वाटते.

या पुस्तकासाठी अनेकांचे मला सहकार्य मिळाले. सर्वात मी माझे मित्र आणि 'लोकमत'चे उपसंपादक विश्वास मोरे यांचा अत्यंत आभार आहे. विश्वास मोरे यांच्यामुळेच हे पुस्तक मी अल्प कालावधीत लिहू शकलो. अन्यथा हे शक्य नव्हते.

लहानपणीचे किस्से गंमती-जमती सांगायच्या. अम्माजींनी लखनौ घराण्याची सुरुवात तसेच संपूर्ण कथकचा इतिहास सांगितला.

अम्माजींनी सांगितलेल्या अनमोल गोष्टी त्याच वेळी मी त्यांच्या शब्दात रेकॉर्ड करून घेतल्या. त्याचा उपयोग मला माझ्या संशोधन कार्यासाठी महत्त्वपूर्ण पुरावा सिद्ध झाला. गुरू महाराजजींच्या मार्गदर्शनाखाली मी 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठा'तून (जानेवारी २००५) विद्यावाचस्पती (डॉक्टरेट) पदवी संपादन केली. या पदवी प्रदान समारंभास स्वत: गुरू महाराजजी उपस्थित होते. ही एक ईश्वरी लिलाच होती.

४ फेब्रुवारीला महाराजजींचा वाढदिवस! या वेळी महाराजजींवरील पुस्तक प्रसिद्ध करायचे ठरविले. पुस्तक मराठी भाषेतूनच लिहायचे पक्के केले. मराठीत पं. बिरजूमहाराजांवर अजुन पुस्तक लिहिले नाही. एकूणच कथक नृत्यावरच मराठीत पुस्तके हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच आहेत. त्यामुळे कथक नृत्याची आवड असणाऱ्यांना कथकविषयी सखोल माहिती मिळणेही अशक्य. पं. बिरजूमहाराजजींच्या नृत्यकार्याची माहिती महाराष्ट्रात प्रत्येकाला व्हावी. तसेच कथकक्वीन सितारादेवी, स्व. गोपीकृष्ण या महान कलाकारांनी महाराष्ट्रात कथकनृत्याचा प्रचार व प्रसार केला.

कथकनृत्य लोकप्रिय केले. त्यांची सविस्तर माहिती मराठी माणसाला व्हावी. या उदात्त हेतूने मराठीत पुस्तक लिहिले. सर्वसामान्यांना आवडेल, समजेल अशी भाषाशैली वापरली. यामुळे हे पुस्तक सर्वांना आवडेल. कथक नृत्य अधिक लोकप्रिय होईल. अशी खात्री वाटते.

या पुस्तकासाठी अनेकांचे मला सहकार्य मिळाले. सर्वात मी माझे मित्र आणि 'लोकमत'चे उपसंपादक विश्वास मोरे यांचा अत्यंत आभार आहे. विश्वास मोरे यांच्यामुळेच हे पुस्तक मी अल्प कालावधीत लिहू शकलो. अन्यथा हे शक्य नव्हते.

या पुस्तकातील नृत्यनिर्मिती, कथकनृत्याच्या इतिहास या प्रकरणांसाठी लेखक वाचस्पती गैरोला, पं. तीरथराम आझाद, डॉ. पुरुदधिच, सौ. मंजिरी देव यांच्या पुस्तकांचा संदर्भ घेतला आहे. या सर्वांचा मी खूप ऋणी आहे.

कथकसम्राज्ञी सितारादीदी व पद्मश्री कुमुदिनी लाखियादीदी यांचा तर मी खूप-खूप आभारी आहे. या जगप्रसिद्ध महान कलाकारांनी माझ्या पुस्तकासाठी आपली मौल्यवान मते व्यक्त करून माझ्या पुस्तकाची उंची वाढविली (शोभा वाढविली) खरंच, मी सितारादीदी व कुमुदिनीदीदी यांचा खूप ऋणी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक, कुलसचिव व डॉ. उमेश केसकर यांनी माझ्या पुस्तकाचे कौतुक केले. शुभेच्छा दिल्या. त्यांचाही


## कथक नृत्य प्रेमींना अनुपम भेट

या पुस्तकात नृत्याचा आरंभ, कथक नृत्याची उत्पत्ती, लखनौ घराण्याची माहिती, कथकक्वीन सितारादेवी, स्व. गोपीकृष्ण व कथकसम्राट पद्मविभूषण पं. बिरजूमहाराज यांचे कथकनृत्यातील योगदान व कथकमधील पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या हा कथक विश्वातील अनमोल ठेवा नक्कीच उपयुक्त ठरेल.


मी अतिशय ऋणी आहे.

हे पुस्तक प्रसिद्ध करण्यासाठी ज्यांनी माझा उत्साह वाढविला ते माझे आई-वडील सौ. विमल व भास्करराव कपोते, भाऊ चंद्रशेखर व राजेंद्र कपोते, वहिनी सौ. वर्षा व साधना कपोते व बहिणी स्मिता शहाणे व माधुरी काळे, प्रशांत शिंदे यांचाही मी आभारी आहे.

माझ्या प्रिय गुरूभगिनी शाश्वती सेन यांनी ही हे पुस्तक लिहिण्यासाठी मला मोलाचे सहकार्य केले. शाश्वतीदीदींचाही मी खूप ऋणी आहे.

**कथकसम्राट बिरजूमहाराज**

कथकनृत्यातील अखेरचा शब्द म्हणजे पं. बिरजूमहाराज आणि पं. बिरजूमहाराजजींचा एक-एक शब्द, कथकविषयी सांगितलेली त्यांनी माहिती आज कथकजगताला महत्वाचा पुरवा आहे. त्यामुळे कथकचे रुप बिघडवणार नाही. पारिभाषिक व्याख्यानांमध्ये बदल करून स्वत:चे अज्ञान प्रकट करणार नाही.

महाराजजींनी मला रात्र-रात्र जागून आपला मौल्यवान वेळ देऊन या पुस्तकासाठी कथक नृत्यासंबंधी सविस्तर माहिती दिलखुलासपणे सर्व पुराव्यानिशी दिली.

महाराजजींचे ऋण शब्दात फेडता येणे अशक्य आहे. आज महाराजजींचे मी एकमेव असा शिष्य आहे की, माझ्याकडे महाराजजींची असंख्य दुर्मिळ छायाचित्रे, तसेच महाराजजींच्या अनेक महत्वपूर्ण गोष्टींचा संग्रह आहे. हे माझे भाग्य आहे. ''गुरूंशी एकनिष्ठता याचे प्रमाण आहे.

या पुस्तकात महाराजजींच्या नृत्यकार्यावर काही प्रमाणात प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. या पुस्तकाच्या पुढील भागात ''संपूर्ण पं. बिरजूमहाराजी'' लवकरच प्रसिद्ध करणार आहे. जे कथक नृत्यात कार्यरत आहेत अशा माझ्या सर्व ''कथक' मित्रमैत्रिणींचा (कलाकारांचा) मी आभारी आहे.

४ फेब्रुवारीला माझे गुरू पं. बिरजूमहाराजजींचा वाढदिवस. तर ३ फेब्रुवारीला माझ्या वडिलांचा वाढदिवस आहे. त्यानिमित्त माझ्या गुरूंच्या व वडिलांच्या चरणी हे पुस्तक मी अर्पण करतो.

**– डॉ. नंदकिशोर कपोते**

## अनुक्रमणिका

१) नृत्यनिर्मिती.................................................. १

२) भारतीय शास्त्रीय नृत्यशैली............................ १७

३) कथक नृत्यातील घराणे.................................. २३

४) मुघल काळात (मुस्लिम) कथकनृत्य.................. २६

५) आधुनिक युगात कथकनृत्य............................ ३१

६) कथकसम्राट.................................................. ३८

७) कथक नृत्यातील पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या....... ५६